# हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड

## प्रेसनोट ता. ४/०७/२०२२

## २० लाखाचे खंडणीसाठी अल्पवयीन मुलाचे अपहरण करून अपहृत मुलाचे वडीलांना फोनद्वारे खंडणी मागणारे इसमांना ६ तासाचे आत ताब्यात घेऊन अपहृत मुलाची सुखरूप सुटका - हिंजवडी पोलीस तपास पथकाची कामगीरी

फिर्यादी नामे सौ. रेखा शंकर कश्यप, वय ३५, रा. बोडकेवाडी, विप्रो सर्कल, मल्हरी बोडके यांची खोली, हिंजवडी फेज २, ता. मुळशी, जि. पुणे यांचा मुलगा नामे सनी शंकर कश्यप, वय १५, रा. सदर हा पाणीपुरीची हातगाडी घेवून घरी येत असताना दि. २/०३/२०२२ रोजी २१:०० वा. चे सुमारास आयसीआयसीआय बँक जवळ, स्वराज पेट्रोल पंपासमोर, फेज २, हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथून कोणीतरी अज्ञात इसमाने खंडणी मागण्याचे उद्देशाने त्याचे अपहरण करून अपहृत मुलाचे वडील नामे शंकर कश्यप यांचे मोबाईल फोनवर आरोपीने फोन करून २० लाख रूपयांची मागणी केली, जर पैसे नाही दिले तर तुमच्या मुलाला मारून टाकू अशी धमकी दिली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

गुन्ह्याच्या तपासादरम्यान गाडीचा नंबर अथवा इतर कोणताही धागा उपलब्ध नसतानाही तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस ठाणे पिं चिं यांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ तपास चालु केला. तपासा दरम्यान अपहृत मुलाचे वडील नामे शंकर कश्यप यांना ज्या मोबाईल क्रमांकावरून खंडणीचा फोन आला होता, त्या नंबरचे तांत्रीक विश्लेषणाद्वारे तसेच घटनास्थळाचे आजुबाजुस एकूण १८ सीसीटीव्ही फुटेज चेक करून संशईत इसम हे मारूती झेन कार क्र एमएच ०४/ए एक्स ४२३८ या गाडीतून अपहृत मुलाला घेऊन अहमदनगर रोडने जात आहेत तसेच सदर आरोपी हे सशस्त्र असल्याची अशी खात्रीशीर बातमी मिळाली. यातील आरोपी हे सशस्त्र असलेने व अपहृत मुलगा हा अल्पवयीन असलेने सदरचा गुन्हा हा खुप संवेदनशील होता. म

ा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हिंजवडी पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांचे दोन पथके तयार करून तात्काळ एक पथकाने अहमदनगर रोडने जाऊन शोध घेतला असता, शिक्रापुर जवळील मलठण फाट्यावर एक काळ्या रंगाची मारूती झेन ही गाडी रस्त्याचे कडेला थांबलेली दिसली व गाडीत काही इसम बसलेले दिसले. तसेच गाडीचा नंबर एमएच ०४/ए एक्स ४२३८ असा असलेने ती गुन्ह्यातील गाडी असल्याची खात्री झाली. त्यानंतर पोलीस अधिकारी यांनी पोलीस अंमलदार यांना आरोपी हे सशस्त्र असून त्यांच्या ताब्यातून अपहृत मुलाला सुखरूप बाहेर काढण्यासाठी व आरोपी यांना ताब्यात घेण्या बाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर टीमने वेशांतर करून एकाच वेळी गाडीच्या चारही दरवाजावर झडप टाकून आरोपींना ताब्यात घेतले. गाडीची तपासणी करता, आत मध्ये एकुण ६ इसम दिसले. त्यांची विचारपूस करता त्यात अपहरण झालेला मुलगा नामे सनी शंकर कश्यप, वय १५, हा मिळून आला. गाडीतील इतर पाच इसमांपैकी दोन विधीसंघर्षीत बालके असून त्या सर्वांची नावे खालील प्रमाणे

**१) लक्ष्मण नथुजी डोंगरे, वय २२, रा. अश्वीनीपुर तांडा, गाव वरूड, ता. पुसद, जि. यवतमाळ**
**२) ज्ञानेश्वर सचीन चव्हाण, वय २२, रा. अश्वीनीपुर तांडा, गाव वरूड, ता. पुसद, जि. यवतमाळ**
**३) लखन किसन चव्हाण, वय २६, रा. अश्वीनीपुर तांडा, गाव वरूड, ता. पुसद, जि. यवतमाळ**
**व २ विधीसंघर्षीत बालके**

अशी सांगीतली. त्यांना तसेच अपहृत मुलगा यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच त्यांचे ताब्यातून एक लोखंडी कोयता, एक लोखंडी तलवार, ५ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल फोन व मारूती झेन कार क्र एमएच ०४/एएक्स ४८६२ असा १,७०,४००/- रू चा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपी यांना विश्वासात घेवून त्यांचेकडे मिळून आलेल्या मोबाईल फोन बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, त्यांनी दि. १/०६/२०२२ रोजी रात्री ९:०० वा. दुचाकी वाहनावरून ट्रिपलसिट जावून टाटा जॉन्सन कंपनीसमोर फेज २, हिंजवडी येथून एका पायी चालत जाणाऱ्या इसमाला अडवून एकाने त्याचे हात पकडून व दुसऱ्याने त्याचे खिशातील मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकाऊन घेवून चोरून नेला होता. सदर बाबत हिंजवडी पो.स्टे. गुरनं ६२२/२०२२, भादवि कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

तसेच दि. २९/०६/२०२२ रोजी फिर्यादी नामे मनिष गणेश राठोड, वय १४, रा. अश्वीनपुर, पुसद, यवतमाळ हे स. ८:३० वा. चे सुमारास घरासमोर उभे असताना यातील आरोपी अक्र ३ व आणखीन एक साथीदार तसेच नमुद दोन विधीसंघर्षीत बालके यांनी फिर्यादी यांना चाकु दाखवून फिर्यादीचे शर्टाचे खिशातील रोख ७००/- रू. तसेच त्यांचे हातातील घड्याळ असे जबरदस्तीने चोरून घेवून गेले आहेत. सदर बाबत पुसद शहर पो.स्टे. गुरनं ३७८/२०२२, भादवि कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून त्यात ते फरार आहेत.

आरोपी यांचे रेकॉर्ड पाहीले असता त्यांच्यावर खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

**लखन किसन चव्हाण - १) आर्नी पो.स्टे.गुरनं ३३२/२०१८, भादवि कलम ३२४,५०४,५०६,३४**
**२) हिंजवडी पो.स्टे. गुरनं ८८०/२०१९, महा.पो.का. कलम ११२/११७**
**३) पुसद शहर पो.स्टे. गुरनं ३७८/२०२२, भादवि कलम ३९२,३४**
**लक्ष्मण नथुजी डोंगरे - १) पुसद ग्रामीण पोस्टे गुरनं ५४६/ भादवि कलम ३९४,३४**
**२) हिंजवडी पो.स्टे. गुरनं ६२२/२०२२, भादवि कलम ३९२,३४**
**ज्ञानेश्वर सचीन चव्हाण १) हिंजवडी पो.स्टे. गुरनं ६२२/२०२२, भादवि कलम ३९२,३४**

**सदर गुन्हयांतील अनोळखी आरोपी यांचा गुन्हा दाखल झाल्यानंतर ६ तासाचे आत शोध घेवून त्यांना दाखल गुन्हयांत अटक करुन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.**

सदरची कारवाई मा.अंकुश शिंदे साो,पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. डॉ संजय शिंदे साो, अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. आनंद भोईटे, पोलीस उप आयुक्त परि. २, पिंपरी चिंचवड मा.श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग वाकड, यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, डॉ.विवेक मुगळीकर, सुनिल दहिफळे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सोन्याबापु देशमुख पोलीस निरीक्षक (गुन्हे), तपास पथकाचे प्रमुख सपोनि, सागर काटे, सपोनि राम गोमारे, तुकाराम खडके, पोउनि, रमेश पवार पोउनि, पोलीस अंमलदार महेश वायबसे, बंडु मारणे, बाळकृष्ण शिंदे, बापुसाहेब धुमाळ, योगेश शिंदे, कैलास केंगले, विक्रम कुदळ, कल्पेश बाबर, अरूण नरळे, चंद्रकांत गडदे, श्रीकांत चव्हाण, कारभारी पालवे, अमर राणे, ओमप्रकाश कांबळे, दत्ता शिंदे, सागर पंडीत, अमित जगताप यांनी केली आहे.

**(आनंद भोईटे)**
**पोलीस उप-आयुक्त परि-२,**
**पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड,**